# बौद्धिक संपदा अधिकार : औषधी आणि कृषी

## Intellectual Property Rights : medicines & Agriculture

**Dr. Rakshit Madan Bagde,**
Assistant Professor, Late. Mansaramji Padole Arts College, Ganeshpur Bhandara
ORCID iD - 0000-0002-7507-0244
Web of Science ResearcherID - AAF-2760-2020
SSRN - Author ID: 4770534
Authenticus ID - R-00J-YM2
Vidwan-ID : 221858

**प्रस्तावना -**

1 जानेवारी 1995 रोजी WTO ची स्थापना होवून भारताने या करारावर सही करून WTO चा स्विकार केलेला आहे. या करारात मुक्त अर्थव्यवस्थेचा स्विकार करण्यात आलेला असून त्याचाच एक भाग म्हणून बौद्धिक संपदा अधिकाराचा समावेश WTO काररात करण्यात आलेला आहे. भारताने स्वातंत्र्यानंतर 1948 साली टेकचंद समीती,1957 मध्ये अय्यंगार समीती, 1965 व 1967 मध्ये संयुक्त संसदीय समीती मार्फत पेटंट प्रश्नांचा सखोल अभ्यास करून सन 1970 मध्ये भारतीय पेटंट कायदा तयार केला होता. त्या 1970 च्या कायद्यामध्ये बदल करून 2005 मध्ये नविन पेटंट कायदा तयार करण्यात आला, जो 5 मे 2006 पासून सुधारित कायदा म्हणून प्रभावीत आहे.

**व्यापार सबंधि बौद्धिक संपदा अधिकर**

Trade related Intellectual Property Rights

या व्यापार सबंधि बौद्धिक संपदा अधिकारात सात घटकांचा समावेश होतो.

1 कॉपीराईट आणि सबंधित अधिकार

2 व्यापारीक चिन्ह

3 भौगोलीक संकेत

4 औद्योगिक डिझाईन

5 शुक्ष्म जीवाणू आणि वनस्पती

6 संघटित सर्किट

7 व्यापारिक रहस्य आणि शोध

वरिल घटकांसबंधी पेटंट अंतर्गत अधिकृत पेटंटमुळे 20 वर्षापर्यंत संपूर्ण विश्वाच्या विरूद्ध एकाधिकार प्राप्त होतो. त्याचे उत्पादन घेण्याकरिता पेटंटधारकाची परवानगी घेवून त्या परवानगीवर मोठया प्रमानात रायल्टी दयावी लागणार आहे. या 20 वर्षाच्या काळात सबंधीत घटकात बदल वा परिवर्तन करण्याचे अधिकारही सबंधीत पेटंटधारकासच असणार आहे. या पेटंट संरक्षणात एक अट ठेवण्यात आलेली आहे ती म्हणजे सबंधीत शोध वा वस्तू देशात तयार करा किंवा आयात करा त्यात कोणताच भेद केला जाणार नाही, त्यामुळे त्या शोधाचा एकाधिकार कायम होवून त्याचा सरसकट फायदा हा त्या पेटंटधारकासच होणार आहे.

## औषधी :-

श्री. बी.के. केयाल, संयोजक - पेटंट कायदा कार्यदल यांच्या मते, नविन पेटंट कायदयात 70% औषधांचा समावेश होणार आहे. परिणामतः बौद्धिक संपदा अधिकराच्या प्रभावातून पेटंटधारकाला मोठी रक्कम दयाची लगाणार आहे. याचा एकंदरित प्रभाव किंमतवाढीवर होवून औषधांच्या किंमती 5 ते 10 पटीने वाढण्याची शक्यता आहे.

सध्या स्थितीत भारतातील 30% जनताच आधुनिक औषधांचे सेवण करण्यास सक्षम आहे तेव्हा उरलेल्या 70% जणतेच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होणार आहे. सध्या भारत औषधांच्या बाबतीत प्रक्रीया पेटंटच्या Process Patent प्रक्रीयेत सामील होतो, परंतू लवकरच भारताचा समावेश उत्पाद पेटंट Product Patent मध्ये होणार आहे. तेव्हा जिवनरक्षक औषधांवर बहुराष्ट्रीय कंपण्यांचा एकाधिकार स्थापन होणार असण्याची स्पष्ट चित्र दिसते आहे.

<u>तक्ता-1</u>

दोन जीवनावश्यक औषधीच्या किमतीचे तुलनात्मक विवरण

किंमती भारतीय रूपयात परिवर्तीत

| औषधी | कंपनी | भारत | पाकिस्थान | ब्रिटेन | यु.एस.ए. |
|---|---|---|---|---|---|
| रेनीटिडीन<br>जैनटेक 300 मि.ग्र. X 10 | ग्लेस्को | 29.03 | 260.40 | 481.31 | 744.65 |
| डाक्लोफिनेक<br>बोवरान 50 मि.ग्र. X 10 | सीबा गीगी | 5.67 | 55.80 | 95.84 | 239.47 |

रेनीटिडीन ही औषध भारतात प्रक्रीया पेटंटच्या Process Patent प्रक्रीयेत येत असून सध्या ती 29.03 रू. मिळते आहे परंतू पाकिस्थान, ब्रिटेन आणि यु.एस.ए. मध्ये उत्पाद पेटंट Product Patent च्या प्रक्रीयेत येत असून पाकिस्थानात भारतीय किंमतीच्या 9.3 पट, ब्रिटेन मध्ये 16.5 पट आणि यु.एस.ए. मध्ये 25.6 पट एवढी जास्त आहे.

तेव्हा या पेटंट कायदयांतर्गत भारतीय गरिब जणतेच्या आरोग्याची किती प्रमाणात निगा राखली जाईल हा एक मोठा प्रश्न निर्माण होतो.

## <u>कृषी :-</u>

व्यापार सबंधि बौद्धिक संपदा अधिकारात शुक्ष्म जिव आणि वनस्पतीचा समावेश करण्यात आला असल्याने त्याचा प्रत्यक्ष प्रभाव हा भारतीय कृषीवर पडणार आहे. या बाबतीत सरकारने बियाने कायदा 2004 मध्ये लोकसभेत पास केला. बियाने गुणवत्तेच्या बाबतीत सरकारने यात अट लादली की, बियाने उत्पादन करणाऱ्यांनी त्यांची बियाने पेटंट करून घ्यावीत. अन्यथा ते बियाने इतरांना पुरवू शकणार नाही पुरविल्यास ती बियाने अवैध ठरवली जातील. अशा व्यवहारांवर लक्ष ठेवण्याकरिता बियाने निरीक्षकांची नेमनूक करण्यात येणार आहे. बियाने निरीक्षकाला एखादया घटनेच्या तपासाकरिता विणापरवाना

शेतकऱ्यांच्या घरात प्रवेश करून झडती घेता येणार आहे. डॉ. वंदना शिवा यालाच **बिजपोलीस** असे संबोधतात. यात दोषी शेतकऱ्यावर 25000रू. पेक्षा जास्त दंडाची तरतूद करण्यात आलेली आहे.

डॉ. वंदना शिवा म्हणतात की, “2004 चा बियाने कायदा आमच्या लाखो शेतकऱ्यांना काहिच देत नाही परंतू खाजगी बिज कंपण्यांचा एकाधिकार मात्र कायम करतात. ज्यातून लाखो शेतकरी कर्जबाजारी होवून आत्महत्या करण्यास प्रेरित होतील.” प्रस्तापीत बियाने कायदा शेतकऱ्यांचा बियाण्यांवरिल पारंपारिक अधिकार हिसकावून बहुराष्ट्रीय कंपण्यांचा एकाधिकार स्थापन करणार आहे.

जागतिक रसायने कपण्यांनी बियाण्यांच्या आणि जैविक तंत्रज्ञानाच्या कंपण्या विकत घेवून त्यास **जीवन–विज्ञान** असे नाव दिले. या कंपण्या जणूके, वनस्पती व प्राण्यांवर पेटंट हक्क दाखवीत आहेत. जैविक अभियांत्रीकिद्वारे तयार केलेल्या 80% बियाण्यांवर अमेरिकेच्या मोन्सॅन्टो कंपनीचा बौद्धिक संपदा अधिकार आहे. या कंपनीकडे कपाशी, एरंड, सोयाबीन यासारख्या पिकांचे पेटंट आहे. ही सर्व मोन्सॅन्टो कंपनीने शोधुन वा तयार केलेली नाहित तर भारत व पुर्व आशियातील शेतकऱ्यांनी नैसर्गिक आणि जैविक विविधतेच्या मदतीने शतकानुशतके सुधारणा करून ती विकसीत केली आहेत.

एका अमेरिकन कंपनीला कडूलिंबाचे किटकनाशक म्हणून पेटंट अधिकार प्रदान केले आहे तर भारतीय बासमती तांदूळ कासमती आणि टेक्समती या नावाने पेटंट केले आहे. भारतीय ज्ञानावर आज अमेरिका हक्क दाखवीतो आहे.

<u>सारांश :–</u>

बौद्धिक संपदा अधिकारामुळे धनाढय राष्ट्र आणखीनच धनाढय होण्याच्या मार्गावर आहे तर भारतासारखे विकसनशिल  राष्ट्राला त्याचा फारसा फायदा होईलच असे निश्चित सांगता येणार नाही. भारतीय शेती, तंत्रज्ञान, लघु आणि कूटीर उद्योग पारंपारीक

असल्याने त्याला या नव्या पेटंट कायदयाचा काहीच लाभ नाही. WTO प्रणित बौद्धिक संपदा अधिकाराचे नियम जनविरोधी असल्याने त्यात बदल होणे गरतेचे आहे. शेवटी आर्थिक लोकशाही आणायची असेल तर जीवघेणी स्पर्धा, संघटीत स्वार्थ, जीवनमात्रांना विक्रीयोग्य बनविण्याचा असला प्रयोग वेळीच थांबवायला हवा.

.....................................................................

संदर्भ ग्रंथ :-


1. दत्त, सुंदरम - भारतीय अर्थव्यवस्था, एस.चंद. कंपनी दिल्ली 2009
2. डॉ. जे.पी. मीश्रा - अर्थशास्त्र, साहित्य भवन पब्लीकेशन आगरा
3. डॉ. रा.य. माहोरे - जागतिक व्यापार संघटनेचे भारतीय शेतीवरिल परिणाम, शोध निबंध.
4. सुलभा ब्रम्हे - गॅट करार, धनंजयराव गाडगीळ प्रबोधनमाला : 10, 2001